**आरोपी क्र. १ करिता फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ अन्वये साक्ष नोंदविण्यात येते.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – रामराम शंकर फोपसे,

वय – ८० वर्षे, व्यवसाय– शेती,

राहणार – तामसवाडी, ता. नेवासा, जि. अहमदनगर

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. के. साबळे यांचे मार्फत सुरू–**

१. दिनांक २६.११.२०१२ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलावले होते किंवा नाही हे मला सांगता येणार नाही. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. माझ्या समक्ष वाळू जप्त केल्याचे मला आठवत नाही. पंचनाम्यामधील मजकूर मला माहित नाही.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली. वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २६.११.२०१२ रोजी पोलीसांनी मला सोनई पोलीस ठाणे येथे बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, तेथे लाल रंगाचा ढंपर क्रमांक एम.एच.१२ ई.एफ. २२६६ व त्यामध्ये अडीच ब्रास वाळू होती व तो ढंपर पोलीसांनी जप्त केला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष पोलीसांनी ढंपर व वाळूचा जप्ती पंचनामा केला, तो मला वाचून दाखवला व त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी

माझ्या ओळखीचा असल्याने त्याला शिक्षा होवू नये याकरीता मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

**स्वाक्षरीत/–**
**(संध्या यु. सुळ)**

दिनांक–०६/१२/२०२५.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२),नेवासा